नवनिर्मित बुटीबोरी नगरपरिषदेच्या अध्यक्ष/सदस्य पदांची सार्वत्रिक तसेच अन्य नगरपरिषदा / नगरपंचायतींमधील रिक्त अध्यक्ष/सदस्य पदांच्या पोटनिवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम - २०१९

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेल**

क्र. रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.०४/का.६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २४ मे, २०१९.

प्रति,
जिल्हाधिकारी,
पुणे, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, धुळे, औरंगाबाद, बीड, परभणी,
हिंगोली, बुलढाणा, यवतमाळ,नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व व गडचिरोली. (१६ जिल्हे)

**विषय :-** **नवनिर्मित बुटीबोरी नगरपरिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांची सार्वत्रिक तसेच अन्य नगर परिषदा/नगरपंचायतींमधील रिक्त अध्यक्ष/सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०१९**

**संदर्भ :-** १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.९/का-६,दि.०७/०५/२०१९ चे आदेश.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१५/का-६, दि.२६/०३/२०१९
३) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.४/का-६, दि.०९/०५/२०१९ चे आदेश.
४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६.

महोदय/महोदया,

सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमूद **बुटीबोरी** नगर परिषदेच्या सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभाग रचना, आरक्षण व सोडत शासन राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झालेली असून नवनिर्मित **बुटीबोरी** नगरपरिषदेच्या सार्वत्रिक तसेच अन्य नगर परिषदा/नगर पंचायतींमधील रिक्त अध्यक्ष/सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित कार्यक्रम विहित कालावधीत पार पाडण्याची कार्यवाही सुरु आहे.

२. त्यानंतर आयोगाकडून संदर्भाधीन अ.क्र. १ येथील आदेशान्वये परिशिष्ट-२ मधील नवनिर्मित बुटीबोरी नगरपरिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक तसेच मानवत नगरपरिषदेमधील रिक्त अध्यक्ष पदाची पोट निवडणूक घेण्याकरिता पूर्वतयारीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३. राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र. ४ येथील अध्यादेश प्रख्यापित केला असून त्यानुसार "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६ )", दिनांक १९/०५/२०१६ व दि.३०/०८/२०१६ अन्वये नगर परिषदांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे. तसेच दि.०४/१०/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अध्यक्ष पदाचे निवडणूक नियम, २०१६ शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर कार्यवाही करावी.

४. **मानवत** नगर परिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती शिवकन्या नंदकुमार स्वामी यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्याने जिल्हाधिकारी, परभणी यांच्या दि.३०/०८/२०१८ रोजीच्या आदेशान्वये त्यांना जात पडताळणी समितीच्या दि.२१/०७/२०१८ रोजीच्या निर्णयाच्या दिनांकापासून नगराध्यक्ष पदावर राहण्यासाठी अनर्ह ठरविण्यात आले होते. जातपडताळणी समितीच्या निर्णयाविरुध्द श्रीमती शिवकन्या स्वामी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.८८४२/२०१८ दाखल केली असून या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या दि.०२/०८/२०१८ रोजीच्या आदेशान्वये रिक्त अध्यक्ष पदाची निवडणूक घेण्यास दि.०३/०१/२०१९ पर्यंत स्थगिती दिली होती. आता या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने दि.२२/०२/२०१९ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित करुन पुढील सुनावणी दि.०४/०६/२०१९ रोजी ठेवली आहे.

If the elections are held, same shall be subject to the decision of this writ petion.

वरील आदेशाचे अवलोकन करता मा. उच्च न्यायालयाने निवडणुकीसाठी स्थगिती दिलेली नसल्याने **मानवत** नगरपरिषदेमधील रिक्त अध्यक्ष पदाची पोट निवडणूक मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून घेण्यात येत आहे.

५. आता, या पत्रान्वये नविनिर्मीत **बुटीबोरी** नगरपरिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक **निवडणुकीकरिता तसेच मानवत** नगरपरिषदेमधील रिक्त अध्यक्ष पदाच्या पोट निवडणुकीकरिता व अन्य नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. सार्वत्रिक/पोट निवडणुका असलेल्या नगर परिषदा / नगर पंचयातींचा तपशील **परिशिष्ट-२** नुसार आहे.

६. निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणूक असलेल्या संपूर्ण संबंधित नगर परिषदेच्या क्षेत्रामध्ये तसेच मानवत नगरपरिषदेमध्ये रिक्त अध्यक्ष पदाची पोट निवडणूक असल्यामुळे संपूर्ण मानवत नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये व अन्य नगर परिषदा/नगर पंचायतींच्या रिक्त सदस्य पदांची पोटनिवडणूक असलेल्या संबंधित प्रभागात लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

७. सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर परिषदेच्या प्रभाग रचना व सार्वत्रिक तसेच पोट निवडणूक असलेल्या नगर परिषदा / नगर पंचायतींच्या मतदार यादीसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द / स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

८. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक ०७/०५/२०१९ च्या व इतर पत्रातील सूचनांनुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभाग.
९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
१०) संबंधित नगर परिषदा व नगर पंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१३) सहायक आयुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१६) निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

## परिशिष्ट -१ (सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी)

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.४/का.६, दि.२४/०५/२०१९ सोबतचे सहपत्र.)**

(i) नवनिर्मित **बुटीबोरी** नगर परिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदांची सार्वत्रिक निवडणूक

(ii) नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमूद २३ रिक्त सदस्य पदांच्या व **मानवत** नगरपरिषदेमधील रिक्त अध्यक्ष पदाची पोट निवडणूक-२०१९.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | २८/०५/२०१९ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | ३०/०५/२०१९ (गुरुवार) सकाळी ११.०० ते ०६/०६/२०१९ (गुरुवार) दुपारी ०२.०० पर्यंत |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | ३०/०५/२०१९ (गुरुवार) ते ०६/०६/२०१९ (गुरुवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत)<br>रविवार दि.०२/०६/२०१९ व बुधवार दि.०५/०६/२०१९ या सुट्टींच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०७/०६/२०१९ (शुक्रवार)<br>सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक<br>**अपील नसेल तेथे** | १३/०६/२०१९ (गुरुवार)<br>दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | **अपील असल्यास**<br>**(i)** वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.<br>**(ii)** निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २३/०६/२०१९ (रविवार)<br>सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २४/०६/२०१९ (सोमवार)<br>सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ९ | **महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे** | कलम १९ आणि ५१-अ-१अ (९) मधील तरतुदींनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\kesharsing.sulane\Desktop\नांदेड-वाघाळा मनपा.docx

# नगर परिषदा / नगर पंचायतींची नावे

परिशिष्ट - २ (सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.४/का-६, दि.२४/०५/२०१९ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर परिषद/नगरपंचायतीचे नाव | नव्याने स्थापन झाल्याचा दिनांक | न.प./न.पं. पोट निवडणूक असलेले प्रभाग व जागा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | -- | -- | बारामती - ५-ब |
| २ | सोलापूर | -- | -- | दुधनी - २-अ |
| ३ | नाशिक | -- | -- | नांदगाव - ७-ब |
| | | -- | -- | देवळा - ११ |
| ४ | अहमदनगर | -- | -- | श्रीरामपूर - ९-ब |
| | | -- | -- | संगमनेर - १०-अ |
| | | -- | -- | जामखेड - १४ |
| ५ | धुळे | -- | -- | दोंडाईचा-वरवाडे - ८-अ |
| ६ | औरंगाबाद | -- | -- | सोयगाव - १६ |
| ७ | बीड | -- | -- | अंबाजोगाई - ४-अ |
| ८ | परभणी | -- | -- | सोनपेठ - १-ब |
| | | --- | | मानवत - अध्यक्ष |
| ९ | हिंगोली | -- | -- | हिंगोली - ११- ब |
| १० | बुलढाणा | -- | -- | जळगाव-जामोद - ८-अ |
| ११ | यवतमाळ | -- | -- | दारव्हा - २-अ |
| १२ | नागपूर | बुटीबोरी | १८/०४/२०१८ | -- |
| १३ | भंडारा | -- | -- | मोहाडी- ४ |
| | | -- | -- | मोहाडी - ९ |
| | | -- | -- | मोहाडी - १२ |
| | | -- | -- | लाखांदूर - १६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | गोंदिया | -- | -- | देवरी - ११ |
| १५ | चंद्रपूर | -- | -- | कोरपना - १५ |
| | | -- | -- | मूल - ६ - अ |
| १६ | गडचिरोली | -- | -- | भामरागड - ५ |
| | | -- | -- | भामरागड - १६ |
| | एकूण | १ | | २४ |